# माइ नेम इज़ खान – एक टीकात्मक परीक्षण

मी चित्रपट पाहत नाही. काल्पनिक व कृत्रिम संवाद मी ऐकू शकत नाही. पण माझे मित्र श्री. पवार सर, यांच्या आग्रहावरून मी 'माइ नेम इज़ खान' हा चित्रपट पाहिला. त्यांचा आग्रह होता की मी हा चित्रपट पाहिलाच पाहिजे कारण यात मुसलमानांवर इंग्रजांकडून होत असलेल्या अन्यायाला अचूक रेखाटले आहे. मी या वाक्याच्या उत्तरात त्यांना त्याच क्षणी जे वाक्य सांगितलं होतं ते वाक्य होतं की शाहरुख खान काही मुस्लिम नाही जो इस्लामवर काही सांगू शकेल. चित्रपट पाहण्याआधीच मी जी प्रतिक्रिया व्यक्त केली होती ती पूर्णपणे बरोबर असल्याचे पूर्ण चित्रपटात मला आढळून आले.

आजच्या मुसलमानांची दुर्दैवी अवस्था या चित्रपटातून दिसते. लादेनसारखे कट्टरपंथी मुस्लिम आणि शाहरुख खानसारखे 'माइ नेम इज़ खान ॲन्ड आइम नॉट अ टेररिस्ट' म्हणणारे मुस्लिम दोघांनाही इस्लामचे ज्ञान नसल्याचे आढळते. (आणि जर त्यांना खऱ्या इस्लामचे ज्ञान असेल तर आपल्या स्वार्थासाठी त्यांनी त्या इस्लामला बाजूला केलेले आहे असेच म्हणावे लागेल.) वरील दोन्ही प्रकारच्या लोकांचा इस्लाम त्यांच्या शब्दांवर व युक्तिवादांवर आधारलेला आहे. त्याला ज्या गोष्टींवर इस्लाम आधारलेला आहे त्या गोष्टींची – अर्थात कुराण व मुहम्मदांच्या जीवनाची – जोड नाही. अशा वेळेस या दोघांचाही इस्लाम शिक्षेस पात्र आहे. निःसंशय त्यांचा हा इस्लाम त्यांना ना या जगात यशस्वी करू शकतो ना मृत्यूनंतरच्या जगात.

सध्याच्या या लेखात संदर्भ 'माइ नेम इज़ खान' या चित्रपटाचा जरी दिलेला असला तरी व्यवहारात कोट्यवधी मुसलमानांची अवस्था या चित्रपटाप्रमाणेच आहे. इस्लामचं ज्ञान नसताना इस्लाम सादर करण्याचं ते पाप करत आहेत. पण हे पाप किती गंभीर आहे याची त्यांना जाणीव नाही. त्यांच्या या अर्धज्ञानी इस्लाममुळे श्री. पवार सरांसारखे कोट्यवधी लोक जे इस्लाम जाणू इच्छितात त्यांच्यापर्यंत इस्लामचा संदेश पोहोचू शकत नाही. उद्या जर या लोकांपर्यंत इस्लामचा खरा संदेश पोहोचला तर ते अंतःकरणातून ओरडून सांगतील की खूप महापापी आहेत आजचे मुस्लिम ज्यांनी आम्हाला इतक्या चांगल्या गोष्टीपासून आजपर्यंत दूर ठेवले होते.

इस्लाम म्हणजे मुसलमानांचा धर्म व कुराण म्हणजे मुसलमानांचा धर्मग्रंथ ही

इस्लाम व कुराणाची चुकीची व्याख्या आहे. इस्लाम व कुराण प्रत्येक मानवासाठी असलेल्या मार्गदर्शक गोष्टी आहेत. ईश्वराची व मानवी जीवनाची खरी संकल्पना स्पष्ट करणाऱ्या या गोष्टी आहेत. दुःखात आशेचा किरण दाखवणाऱ्या या गोष्टी आहेत, असहाय्य माणसाला साहाय्य देणाऱ्या या गोष्टी आहेत, माणसाच्या जिज्ञासू बुद्धीला वैचारिक खाद्य पुरवणाऱ्या या गोष्टी आहेत.

इस्लामच्या गोष्टी कोणत्या अजब गोष्टी नाहीत. या गोष्टी कोणत्या काल्पनिक जगाच्या नाहीत. या अगदी साध्या गोष्टी आहेत, व्यावहारिक गोष्टी आहेत. या गोष्टी प्रत्येकाच्या अंतःकरणावर सुद्धा छापलेल्या आहेत. आणि म्हणून जेव्हा कोणताही माणूस यांचा प्रामाणिक अभ्यास करेल त्याचं अंतःकरण भरून येईल आणि तो या गोष्टीची साक्ष देईल की इस्लाम तेच सांगतो जे त्याला नेहमी वाटायचं. त्याला दिसून येईल की इस्लामने रेखाटलेला ईश्वर तसाच आहे जसा ईश्वर असला पाहिजे. त्याला दिसेल की इस्लामने सांगितलेली जीवनाची संकल्पना त्याच्या बुद्धीला पटणारी आहे. त्याला पूर्ण इस्लाममधे कुठे विसंगती दिसणार नाही, कोणत्या कालबाह्य व अव्यवहारिक गोष्टी दिसणार नाहीत. समाजाला दूषित करणाऱ्या गोष्टी त्याला इस्लाममध्ये दिसणार नाहीत. इस्लामच्या गोष्टी या मानवनिर्मित नाहीत तर ईश्वरनिर्मित आहेत याचा तो क्षणोक्षणी अनुभव घेईल.

आजच्या मुसलमानांसाठी खूप बरं राहिलं असतं जर त्यांनी आपल्या अपूर्ण ज्ञानाने इतरांना इस्लाम सांगण्यापेक्षा हे स्पष्ट करून टाकलं असतं की आम्हाला इस्लामचं ज्ञान नाही, आपल्याला इस्लाम शिकायचा असल्यास कृपया स्वतः इस्लामचा अभ्यास करून घ्या. आणि इस्लामचा अभ्यास म्हणजे फक्त दोनच गोष्टी आहेत – १. कुराण आणि प्रेषित मुहम्मदांचं जीवन.

सध्या आपण 'माइ नेम इज़ खान' या चित्रपटाकडे वळू या.

चित्रपटाच्या सुरुवातीलाच माणसांचं वर्गीकरण फक्त दोन भागात – चांगले व वाईट असे करून आपण किती समंजस विचार प्रस्तुत करत आहोत असे शाहरुख खान दाखवतो. पण हे अर्धज्ञानी डोक्यातून सुचलेले विचार आहेत. अपूर्ण ज्ञान असलेल्या व्यक्तीच्या डोक्यात जेव्हा एखादी क्षुल्लक गोष्ट येते त्याला ती गोष्ट सुद्धा खूप महान वाटते. कारण त्यापेक्षा अधिक महान असलेल्या गोष्टी जगात अस्तित्वात असल्याचे त्याला ज्ञान नसते. शाहरुख खानचे हे विचार सुद्धा याच प्रकारचे आहेत.

माणसाने स्वतःचे विभाजन वेगवेगळ्या धर्मात व जातींमधे केलेले असले तरी इस्लामची भूमिका स्पष्ट आहे. माणसाची निर्मिती एका व्यक्तीपासून झाली. पृथ्वीवर वसलेले पहिले स्त्रीपुरूष म्हणजे ॲडम आणि इव्ह. यांपासून समस्त मानवजात तयार झाली. याचा अर्थ होतो आज जगात असलेले सर्व ६५० कोटी लोक एकमेकांचे नातेवाईक आहेत. फक्त आपल्याला हे माहीत नाही की दुसऱ्या व्यक्तीशी आपलं कोणतं नातं आहे. एखाद्याला जर आपण प्रश्न केला की तुझ्या पणजोबांच्या पणजोबांचं नाव काय होतं, ते कुठे राहायचे आणि काय करायचे मला थोडी माहिती सांग. त्याला याचं उत्तर देता येणार नाही. दोन वेगवेगळ्या धर्मातील आजच्या कट्टर शत्रूंचे २०० वर्षापूर्वीचे पूर्वज सख्खे भाऊ असलेले असू शकतात. याचप्रमाणे मागे जात गेल्यास प्रत्येकाचं शेवटी ॲडम आणि इव्ह पर्यंत नातं पोहोचतं. थोडक्यात सर्व माणसे ॲडमचीच मुले असल्याने ते एकच जमात आहेत. सर्व जण समान आहेत.

माणसांची विभागणी चांगले व वाईट मधे करणे ही अपूर्ण विभागणी आहे. परिस्थिती पाहून चांगली कृत्ये करणारा माणूस ढोंगी असतो. माणसांची विभागणी ईश्वराचे भय बाळगणाऱ्यांत व भय न बाळगणाऱ्यांत केली जाऊ शकते. ईश्वराची भिती न बाळगणारा, उद्या ईश्वराकडे मला जाब द्यावा लागणार आहे हे समजून न जगणारा कधीच सातत्याने चांगली कामे करू शकत नाही. याउलट ईश्वर आपल्याला प्रत्येक क्षणी पाहत आहे ही जाणीव आणि कोणत्याही क्षणी हे जग सोडून जावं लागेल या वास्तविकतेचं भान माणसाला चूक कृत्ये न करू देण्यास समर्थ आहे. शाहरुख खानच्या आईने काढलेल्या चित्राप्रमाणे लॉलिपाप देणारा चांगला व काठीने मारणारा वाईट हे स्पष्टीकरण पुरेसे नाही. कृतीला त्याच्या हेतूनुसार बघावं लागतं. हेतूरहित कृत्ये जनावरांच्या कृतीप्रमाणे असतात. अमर्याद ज्ञानी ईश्वराने दाखवलेला मार्ग आणि मर्यादित ज्ञानाच्या मानवी बुद्धीतून निघालेले विचार कधीच सारखे होऊ शकत नाहीत. शहाणा माणूस तो आहे जो कोणत्याही गोष्टीवर आपली काल्पनिक भूमिका मांडण्यापेक्षा यावर ईश्वराची काय भूमिका आहे हे त्याच्या पुस्तकांतून किंवा त्याने संमती दाखविलेल्या व्यक्तीच्या जीवनातून (जसे प्रेषित मुहम्मद, प्रेषित येशू, मूसा, ... ) शोधून काढतो व त्यानुसार जीवन जगतो.

माझ्या आईला तिच्या मृत्युसमयी दिलेल्या वचनानुसार की मला आनंदी जीवन

जगायचे आहे मी अमेरिकेला आलो असं शाहरुख खान म्हणतो. यातील ‘आनंदी जीवन’ याचा पुढे सुद्धा आणखी एकदा त्याने पुनरुच्चार केला आहे. मुळात ही इस्लामविरोधी संकल्पना आहे. बुद्धिवादी मुस्लिम असं वाक्य म्हणू शकत नाही. कुराणाचं वाक्य आहे ‘आम्ही माणसाला त्रासात टाकलं आहे’. हे वाक्य त्याचं आहे ज्याची ही पृथ्वी आहे. त्याने सांगितलेली गोष्ट पृथ्वीवर घडण्यास बांधील आहे. जगातील कोणतीच व्यक्ती आनंदी व समाधानी जीवनाचा दावा करू शकत नाही. प्रत्येकाला प्रत्येक क्षणी आणखी कशाची तरी गरज असते किंवा आणखी कशापासून तरी त्याला मुक्ती हवी असते.

इस्लामची मानवी जीवनाबद्दलची कल्पना स्पष्ट आहे. इस्लामच्या शिकवणुकीनुसार मानव ही शाश्वत निर्मिती आहे. त्याला नेहमीसाठी जगायचं आहे. ईश्वराने फक्त त्याच्या जीवनाचे दोन भाग केलेले आहेत – १. मृत्युपूर्व जीवन (सध्याचे या पृथ्वीवरील जीवन), २) मृत्यूनंतरचे जीवन (स्वर्ग किंवा नरकातील शाश्वत जीवन). यातील पहिल्या भागावर दुसऱ्या भागाचे जीवन अवलंबून आहे. इथे त्याला आनंदामागे किंवा त्रासांपासून मुक्तीमागे धावण्याची गरज नाही कारण इथे त्याला शाश्वत जगायचं नाही. त्याला आनंदी जीवन तिथे मिळवायचं आहे जिथे तो शाश्वत राहणार आहे – अर्थात स्वर्गामध्ये. त्याच्या आईला त्याला हा सल्ला द्यायला पाहिजे होता की बाळ, हे जीवन काही वर्षांचं आहे, उद्या तुला सुद्धा माझ्याच प्रमाणे हे जग सोडून यायचं आहे. तू इथल्या यशाचा नाही तर तिथल्या यशाचा विचार कर जिथे आपण नेहमीसाठी एकत्र राहणार आहोत.

इस्लामची भूमिका मांडणारी दोन्ही बाजूची वक्तव्ये या चित्रपटात चुकीची होती. जसे शाहरुख खानच्या लग्नासंबंधी शाहरुख खानची व त्याच्या भावाची भूमिका. दोघांचीही भूमिका ज्ञानाशिवाय व पुराव्याशिवाय आहे. इस्लाममध्ये अनेकेश्वरवादी (मूर्तिपूजक) मुलीशी लग्न करण्याची परवानगी नाही. इस्लामची ही भूमिका व्यावहारिक भूमिका आहे. पण ही भूमिका प्रामाणिक मुसलमानांसाठीच आहे, शाहरुख खान सारख्या केवळ नाव शाहरुख आहे म्हणून मुसलमान असलेल्या व इस्लामचं कसलंच ज्ञान नसलेल्या मुसलमानांसाठी नाही.

दोन टोकाच्या विचारसरणीचे व्यक्ती तेव्हाच विनाकलह सोबत राहू शकतात

जेव्हा आपल्या विचारसरणीबाबत ते अप्रामाणिक आहेत. माझंही खरं आणि तुझंही खरं हा ढोंगीपणा आहे. वास्तविकतेमधे दोन गोष्टी कधीच खऱ्या असू शकत नाहीत. जगातील कोणत्याही क्षेत्रात सत्य नेहमी एकच असते. इस्लाम सांगतो केवळ एका ईश्वराशिवाय कोणीच पूजेच्या लायक नाही. ईश्वर सोडून इतर कोणताही सजीव, निर्जीव फक्त त्याची निर्मिती आहे आणि ईश्वर निर्माता आहे, तोच पूजेस पात्र आहे. अशा वेळेस खरा मुस्लिम जेव्हा आपल्या सोबतीला दुसऱ्या कोणाची पूजा करताना पाहील तो त्याला सांगेल की ज्याची तू पूजा करत आहेस तो तुला काहीच देऊ शकत नाही, ती फक्त वस्तू आहे, प्रतिमा आहे आणि ज्याची ती प्रतिमा आहे ती व्यक्ती सुद्धा ईश्वराचीच निर्मिती होती शिवाय सध्या ती मेलेली सुद्धा आहे आणि तुझं ती काहीच ऐकू शकत नाही, तुला काहीच देऊ शकत नाही. याउलट ज्याची मी प्रार्थना करतो तो निर्मिती नाही, तो निर्माता आहे. तो सर्व काही करू शकतो, सर्व काही त्याच्या नियंत्रणात आहे. तो कोणाचा पुत्र नाही त्याचा कोणी बाप नाही. तो पूर्णपणे पवित्र आणि मुक्त आहे अशा मानवी गोष्टींपासून. तो स्वतःहून आहे, त्याला कोणाची गरज नाही. त्याला केली गेलेली प्रार्थना तो ऐकू शकतो, तो उत्तर देऊ शकतो, तो सदैव जिवंत आहे, तो कधीच मरू शकत नाही, तो ईश्वर आहे.

इस्लाम सांगतो स्वतःला आणि स्वतःच्या परिवाराला नरकाच्या आगीपासून वाचवा. खरा मुस्लिम हेच काम करतो. असं शक्य नाही की त्याची पत्नी नरकाच्या दिशेने जात आहे आणि तो माझंही खरं आणि तुझंही खरं अशा दुटप्पी भूमिकेत जीवन जगतो. स्वर्ग आणि नरक माणसाचे नाहीत. हे ईश्वराचे आहेत. यातील कशात कोणाला टाकायचं हे ठरवण्याचा हक्क माणसाला नाही, हे ठरवण्याचा हक्क त्याच्या मालकाला आहे, ईश्वर त्याचा मालक आहे. त्याने आपल्या पुस्तकातून हे स्पष्ट केलं आहे की नरकाचे रहिवासी कोण असतील व स्वर्गाचे कोण.

कुराणात ठिकठिकाणी स्वर्गात जाण्यासाठी दोन गोष्टींच्या पूर्ततेबद्दल सांगितलेले आहे – १. ईश्वरावरचा विश्वास (अर्थातच खऱ्या ईश्वरावरचा), २. चांगली कृत्ये. याचा अर्थ तुम्ही खूप चांगली कृत्ये करत असाल पण तुमचा त्या ईश्वरावर विश्वास नसेल ज्याच्याशी उद्या तुमचा सामना होणार आहे तर त्या चांगल्या कृत्यांना काहीही अर्थ नाही. तो त्या चांगल्या कृत्यांचा तुम्हाला मोबदला देणार नाही.

तुमच्या चांगल्या कृत्यांचा मोबदला त्या क्षणी तुमचा जो हेतू होता त्यानुसार तुम्हाला मिळेल. म्हणजे कोणी चांगली कृत्ये सुप्रसिद्ध व्यक्ती बनण्यासाठी करत असेल तर तो लोकांमध्ये सुप्रसिद्ध होईल, आपला व्यवसाय वाढवण्याच्या उद्देशाने करत असेल तर त्याचा व्यवसाय वाढेल. पण त्याची चांगली कृत्ये त्याला स्वर्गात घेऊन जाणार नाहीत कारण स्वर्गाच्या मालकावर कधी त्याचा विश्वासच नव्हता. याचप्रमाणे केवळ ईश्वरावरचा निष्क्रिय विश्वास सुद्धा उपयोगाचा नाही, त्याच्यासोबत कृतीची जोड आवश्यक आहे.

अशा परिस्थितीत एकेश्वरवादी व्यक्ती व अनेकेश्वरवादी व्यक्ती दोघे सोबत राहत असल्यास दोघांमध्ये धार्मिक मुद्द्यावर भांडण होणे स्वाभाविक आहे. दोघेही आपलीच गोष्ट खरी आहे हे सिद्ध करण्याचा प्रयत्न करतील. अशा वेळेस एक तर या भांडणांचे रूपांतर विवाह संपण्यात होईल किंवा दोघे एकमेकांसह ढोंगी प्रवृत्तीचा स्वीकार करून जीवन जगू लागतील. पण या ढोंगी प्रवृत्तीचं भविष्य काय आहे? या ढोंगी लोकांना जगण्याची संधी या जगापुरतीच आहे. यानंतरच्या जगात त्यांच्यासाठी नरकाची शिक्षा आहे. स्वर्गात त्यांना प्रवेश मिळू शकत नाही. कारण स्वर्ग म्हणजे एक पवित्र वसाहत आहे. स्वर्गात फक्त तेच लोक वास्तव्य करू शकतात जे शुद्ध अंतःकरणाचे होते. ज्यांच्या अंतःकरणात दुसऱ्यासाठी तळमळ होती. सर्व प्रेषितांची व त्यांच्यासारखे जीवन जगणाऱ्यांची अशीच अवस्था होती. ते नेहमी स्वतःला व इतरांना नरकापासून वाचवण्यासाठी धडपडायचे.

मुहम्मद पैगंबरांचं सुद्धा असंच एक वाक्य आहे. ते म्हणाले, तुम्ही लोक नरकाकडे धावत जात आहात आणि तुम्हाला स्वर्गाकडे ओढण्याचा मी प्रयत्न करत आहे. कोणताही खरा मुस्लिम हेच काम करेल. प्रारंभीच्या मुसलमानांनी हेच काम केलं. त्यांनी स्वतःला नरकापासून वाचवण्याची तयारी केली. शिवाय इतरांना सुद्धा त्या गोष्टीकडे निमंत्रित केले. त्यांचं हे कृत्य इस्लामी कृत्य असल्याने ते सर्व ठिकाणी विजयी होत गेले, समस्त जगावर त्यांनी राज्य केलं. पण कालांतराने जेव्हा असे मुस्लिम निघाले ज्यांना स्वतःला नरकापासून वाचवण्याची गरज वाटली नाही, त्यांनी मुस्लिम घरात जन्म घेणं यालाच इस्लामवर असण्याचा पुरावा मानला व आपण स्वर्गातच जाणारे आहोत असा पुरावाहीन तर्क बाळगला. शिवाय स्वतःलाच इस्लाम माहीत नसल्याने इतरांना सुद्धा खऱ्या इस्लामचे दर्शन करवण्यास ते पात्र

ठरले नाहीत. याचं रूपांतर त्यांच्या पतनात झालं. आज जगात सगळीकडे त्यांचं पतन सुरू आहे. हे पतन त्यांना वाटतं इंग्रजांमुळे किंवा त्यांचं नाव 'खान' असल्यामुळे आहे. पण वास्तविकता ही नाही. त्यांचं पतन ते न करत असलेल्या कामामुळे आहे. त्यांना पुन्हा जर चांगले दिवस हवे असतील तर त्यांना पुन्हा त्याच पद्धतीने जावं लागेल ज्या पद्धतीने ईश्वराचे प्रेषित गेले होते. त्यांना या जगासाठी धडपडणं सोडून द्यावं लागेल. त्यांना स्वतःला स्वर्गास पात्र बनवण्याची तयारी करावी लागेल. इतरांना स्वर्गाचा मार्ग दाखवावा लागेल. त्यांना इस्लाम शिकावा लागेल. त्यांना इस्लामचा पुन्हा स्वीकार करावा लागेल.

चित्रपटातील शाहरुखच्या विवाहाचे चित्रीकरण सुद्धा 'माइ नेम इज़ खान बट आइम नॉट अ मुस्लिम' या प्रकारचे होते. जवळपास सर्वच परिस्थितीत चित्रपटात रेखाटलेलं मानवी जीवन फक्त जगणं आपला उद्देश आहे म्हणून आपल्याला जगायचं आहे या प्रकारचं होतं. पण हे जीवन जनावरांप्रमाणे आहे. जनावर सुद्धा खातात, पितात, उठतात, बसतात, जन्म देतात, ... थोडक्यात माणूस करत असलेल्या सर्व गोष्टी ते करतात. फक्त त्यांच्याकडे एकाच गोष्टीची उणीव आहे ती म्हणजे ते विचार करू शकत नाहीत. पण माणूस विचार करू शकतो. अशा वेळेस विचार न करता जीवन जगणारे लोक किंवा सध्याच्या तात्पुरत्या क्षणाचा विचार करणारे लोक जनावरांप्रमाणे आहेत. अशा लोकांसाठी ईश्वराकडे शिक्षा आहे.

चित्रपटात शाहरुखच्या मुलाचा मृत्यू होतो. शाहरुख म्हणतो, ''इन्ना लिल्लाही व इन्ना इलैही राजिऊन''. जेव्हा बाळाच्या अंतिम संस्काराची वेळ येते, त्याची आई अर्थात काजोल ओरडते, ''सॅम, कम बॅक सॅम, कम बॅक, ...'. जनावरांप्रमाणे शाहरुख व काजोल आत्तापर्यंत एकत्र राहत होते व मानवांप्रमाणे कधी त्यांच्यात वैचारिक देवाणघेवाण झाली नाही हा त्याचा पुरावा आहे. शाहरुखने जे वाक्य बाळाच्या मृत्यूवर उच्चारले त्याचा त्याला अर्थ माहीत होता का नाही हे मला माहीत नाही. पण जर त्याला याचा अर्थ माहीत असता तर तो आपल्या पत्नीला आशेचा किरण दाखवू शकला असता. एखाद्याच्या मृत्यूवर बोलले जाणारे वाक्य ''इन्ना लिल्लाही व इन्ना इलैही राजिऊन'' चा अर्थ होतो, ''निःसंशय आम्ही ईश्वरासाठीच आहोत आणि आम्हाला त्याच्याकडेच परत जायचे आहे.'' म्हणजे एक जण सांगत आहे की बाळ तू जिथे गेलास तिथे उद्या मला सुद्धा यायचंच आहे.

आणि दुसरी सांगत आहे बाळ तू जिथे गेलास तिथून परत ये. पती पत्नीच्या विचारसरणीतील हा फरक अगदी टोकाचा फरक आहे.

आपल्या मुलाच्या मृत्यूबाबत शाहरुख म्हणतो, ''अल्लामियां भी उसे अपने पास पाकर खुश होंगे.'' अर्थहीन वाक्य आहे हे. कसल्याच पुराव्याची याला जोड नाही. सॅमचा कथानकात रेखाटलेला मृत्यू स्वतः ओढवलेला मृत्यू होता. त्याचे शत्रू वेळोवेळी निघून जात असताना सुद्धा त्याने त्यांना आपल्यावर तुटून पडण्यास प्रवृत्त केले. परिस्थिती आपल्या विरुद्ध असताना सुद्धा त्याने लढण्याचा मार्ग निवडला जो पूर्णपणे इस्लामविरोधी होता. यात त्या बालकाच्या चुकीसह त्याच्या अशिक्षित आईवडिलांनी त्याला न दिलेल्या संस्कारांची भूमिका होती. मुस्लिम, अमुस्लिम नावाची गोष्ट नसते तर केवळ चांगले वाईट नावाची गोष्ट असते व आपण दोघेही चांगले आहोत म्हणून आपण दोघांनी विवाह केला या काल्पनिक विशाल हृदयाच्या विचारसरणीने त्यांना आपल्या बाळास चांगले संस्कार देता आले नाहीत.

मुहम्मद पैगंबरांनी आपल्या समस्त जीवनात नेहमी शांतीचा मार्ग स्वीकारला. दोन गोष्टींपैकी नेहमी सोपी गोष्ट त्यांनी निवडली. भांडण करणं, युद्ध करणं त्यांना परवडणारं नव्हतं. त्यांच्या जीवनाचा उद्देश होता. निरर्थक गोष्टींत वेळ वाया घालवण्याचा विचार सुद्धा ते करू शकले नसते. याचाच पुरावा म्हणून युद्धाचा मार्ग न निवडता त्यांनी आपले मातृस्थान मक्का सोडून शांतीने मदीनेला स्थलांतर केले. परत पुढे सुद्धा त्यांनी शत्रूंसोबत युद्ध न करता एकतर्फी शांतता करार केला. मुहम्मद पैगंबरांच्या जीवनात घडलेले युद्धाचे किरकोळ प्रकार फक्त तेव्हाच होते जेव्हा त्यांच्या शत्रूने त्यांच्यासमोर दुसरा कोणता पर्याय शिल्लक ठेवला नव्हता. ज्याला वाटतं आपण मुहम्मदांचे अनुयायी आहोत त्याला स्वतः सुद्धा याच पद्धतीने जायला पाहिजे व आपल्या परिवाराला व इतरांना सुद्धा अशीच शिकवण द्यायला पाहिजे. पण शाहरुख खान अशा गोष्टींची त्याच्या घरी चर्चा करू शकला नसता किंवा त्याच्या मुलाला असे संस्कार देऊ शकला नसता. कारण त्याला माहीत होतं की तो चांगला आहे, त्याच्या आईने त्याला हे सांगितलं होतं. शिवाय हे पण सांगितलं होतं की दुसरे काही चांगले आहेत व काही वाईट आहेत.

नंतर चित्रपटाच्या उत्तरार्धात एका निरर्थक ध्येयाच्या पूर्तीसाठी शाहरुख खान निघाल्याचे दाखवण्यात आले आहे. त्याला अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाला तो

आतंकवादी नाही हे सांगायचे होते. वास्तविक पाहता माणसाला या जगामध्ये कोणालाही काहीही दाखवायचे नाही. जगातील कोणतीच शक्ती कोणाला काही फायदा देऊ शकत नाही किंवा कोणाला काही त्रास देऊ शकत नाही. मग तो अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष असो किंवा एखाद्या गरीब देशाचा गरीब नागरिक. अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष ईश्वराच्या नजरेतून सुटलेला नाही. तो ज्या ऑक्सिजनच्या साहाय्याने जीवन जगत आहे तो त्या ऑक्सिजनचा निर्माता नाही. ईश्वराने दिलेल्या स्वातंत्र्यामुळे तो श्वास घेऊ शकत आहे. स्वातंत्र्य देणारा कधीही स्वातंत्र्य हिरावून घेऊ शकतो. स्वतःला जास्त शक्तिशाली समजणाऱ्याचे अंग निकामी व्हायला जास्त वेळ लागत नाही. जगातील बरेच सत्ताधीश असहाय्य अवस्थेत हे जग सोडून गेले.

एका व्यक्तीला दोन मुले असतील आणि एक मुलगा सातत्याने दुसऱ्याला त्रास देत असेल व दुसरा फक्त सहन करत असेल या विचाराने की मी सुद्धा चूकच वागलो तर माझ्या वडिलांना वाईट वाटेल. अशा परिस्थितीत त्या मुलाचे वडील काय करतील? ते निःसंशय आपल्या चांगल्या मुलाची बाजू घेतील व दुसऱ्याला शिक्षा करतील. पण जर दोघेही चूक करत असतील तर जगातील कोणताही प्रामाणिक पिता दोघांपैकी एकाची बाजू घेऊ शकत नाही. मुसलमानांना या गोष्टीकडे लक्ष द्यायला पाहिजे. त्यांनी स्वतः एखाद्याशी शत्रुत्व न स्वीकारता ईश्वराच्या निवाड्याची वाट पाहिली पाहिजे आणि स्वतःला अधिकाधिक प्रामाणिक करण्याचा प्रयत्न करत राहायला पाहिजे.

काल परवा कुठेतरी शिमोगामध्ये तस्लीमा नसरीनच्या लेखावरून दंगल झाली. मुसलमान आपल्या बुद्धीला वापरत नसल्याचा हा आणखी एक पुरावा आहे. त्यांना जर तस्लीमा नसरीनचे विचार पटले नाहीत तर ते दंगल करण्यापेक्षा असा सुद्धा विचार करू शकले असते की तस्लीमा नसरीन आणखी किती दिवस जगणार आहे – १०, १५, २० वर्षे? आणि कसं जगणार आहे ती? काही काळानंतर तिच्या शरीराची झीज होईल, एखादी किडनी निष्क्रिय होईल, काही दिवस कृत्रिम ऑक्सिजनवर पडून राहील, हॉस्पिटलमध्ये बरेच दिवस कुजून एक दिवस मरेल. आणि मेली म्हणजे संपलं नाही. संपलं तर फक्त तिचं स्वातंत्र्य. आता ती लिहू शकत नाही. ती युक्तिवाद करू शकत नाही. असहाय्यपणे ईश्वराने दिलेला निर्णय शाश्वत काळासाठी तिला सहन करावा लागेल. वास्तविकता अशी असताना

मुसलमानांनी दंगल करायलाच का पाहिजे? ते तितकाच वेळ एखाद्या रचनात्मक कार्यासाठी, स्वतःच्या शैक्षणिक व बौद्धिक विकासासाठी वापरू शकत नाहीत का?

मुसलमानांकडून असंख्य चुका यासाठी घडत आहेत कारण त्यांचा इस्लाम त्यांनी स्वीकारलेला इस्लाम नाही, त्यांनी अभ्यासलेला इस्लाम नाही. ते मुस्लिम यासाठी आहेत कारण त्यांचा जन्म मुस्लिम घराण्यात झाला. पण दुर्दैवाने हा इस्लाम ईश्वराकडे स्वीकारला जाणारा इस्लाम नाही. सध्याच्या मुसलमानांचा इस्लाम जर खरा इस्लाम असता तर कोणता अमेरिकेचा, इस्राईलचा किंवा आणखी कुठला राज्यकर्ता त्यांना त्रास देऊन श्वास घेऊ शकला नसता. त्यांच्या बाजूने ईश्वर उभा राहिला असता. आणि ज्याच्या बाजूने पृथ्वीचा निर्माता उभा राहतो त्याच्यासमोर पृथ्वीवर नगण्य अवस्थेप्रमाणे असणारे ५-६ फुटाचे हे लोक कोणतं अस्तित्व ठेवत नाहीत. अशा परिस्थितीत मुसलमानांना इस्लाम शिकण्याची, त्याला स्वीकारण्याची व त्यानुसार आचरण करण्याची गरज आहे. त्यांना जगात घडणाऱ्या घडामोडींपासून पूर्णपणे अलिप्त होऊन ईश्वराच्या निवाड्याची वाट पाहण्याची गरज आहे. यातच त्यांचं भलं आहे. 'माइ नेम इज़ खान ॲन्ड आइम नॉट अ टेररिस्ट' म्हणत अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाला भगवान बनवण्याचं पाप करून ईश्वराच्या शिक्षेस पात्र होण्याची चूक त्यांनी करायला नको.

शाहरुख खानची चित्रपटाच्या उत्तरार्धातील सर्व खटपट एका बाईला परत मिळविण्यासाठी होती, तसं चित्रपटाच्या जाहिरात फलकावर सुद्धा लिहिलेलं होतं – for his love. खऱ्या मुसलमानाचं हे कधीच ध्येय असत नाही. त्याला इस्लाम ईश्वरकेंद्रित जीवन जगायला शिकवतो, स्वकेंद्रित किंवा स्त्रीकेंद्रित किंवा आणखी काही केंद्रितला इस्लाममध्ये जागाच नाही. मुहम्मद पैगंबरांचं वाक्य आहे, 'मैत्री करण्यासाठी ईश्वर पुरेसा मित्र आहे.' मुस्लिम नेहमी स्वतःला ईश्वराच्या नजरेसमोर आहोत या जाणिवेने जगतो. तो ईश्वराशी बोलत असतो, तो ईश्वराची मदत घेत असतो. तो प्रशंसा करतो तर फक्त ईश्वराची. तो प्रत्येक चांगल्या गोष्टीमध्ये ईश्वराला अनुभवतो, तो इतरांना सुद्धा ईश्वराशी जोडण्याचा प्रयत्न करत असतो. तो एखाद्या नष्ट होणाऱ्या गोष्टीमागे धावू शकत नाही, त्या गोष्टींना आपलं ध्येय बनवू शकत नाही.

शाहरुख खानने त्याला खान असल्यामुळे दिल्या गेलेल्या त्रासाचे जे चित्रण केलेले आहे ते सुद्धा त्यात त्याचीच चूक असल्याचे स्पष्ट करणारे आहे. आपली चूक पाहण्यापेक्षा दुसऱ्याची चूक पाहण्याची मानसिकता यातून दिसते. शाहरुखला पहिल्यांदा झालेली अटक त्याच्या हातात असलेले दगड आणि तो त्यानुसार काही पुटपुटत असल्याच्या शंकेवरून झाल्याचे दाखवलेले आहे. यात स्वतः शाहरुख खानची चूक आहे. इस्लाम प्रदर्शन करायला शिकवत नाही. इस्लाम सांगतो तुम्ही ईश्वराला अंतःकरणातून हाक मारा किंवा मोठ्याने हाक मारा तो तुम्हाला ऐकू शकतो. अशा वेळेस दहा जणांत उभे राहून एखादी गोष्ट इतरांना न कळणाऱ्या भाषेत मोठ्याने म्हणून दाखवणे मूर्खपणाचे आहे. आपल्यामुळे इतरांची शांतता भंग होणार नाही याची काळजी घेणे मुसलमानावर अत्यंत बंधनकारक आहे. पण शाहरुखला हे कळलं नाही. असंच कृत्य नंतर श्रद्धांजली अर्पण करताना किंवा आणखी काही प्रसंगी त्याने केल्याचे चित्रपटात चित्रित केले आहे. अंतिम वेळेस जेव्हा शाहरुख खानला अटक झाली ती सुद्धा त्याच्या चूक कृत्यामुळे होती. शाहरुख खानचा राष्ट्राध्यक्षांना भेटण्याचा उद्देश तर चुकीचा होताच शिवाय ज्या पद्धतीने तो लोकांत उभा राहून ओरडून सांगत होता त्याला तसं करायला नको होतं. त्याला दुसरा कोणता व्यावहारिक मार्ग उपलब्ध आहे का याकडे लक्ष द्यायला पाहिजे होतं. इस्लाम व्यावहारिकता शिकवतो. काल्पनिक, काव्यमय गोष्टींना इस्लाममधे जागा नाही.

अमेरिकेच्या एका मशिदीत एक नेता इतरांना भडकावत असल्याच्या घटनेचे चित्रण करताना ज्या उदाहरणाचा शाहरुखने दाखला दिला त्या बाबत सुद्धा त्याने खोटी गोष्ट सांगितली. मुलाच्या बलिदानाबद्दल अब्रॅहमला ईश्वराने नाही तर सैतानाने प्रवृत्त केल्याचे त्याने सांगितले. ही पूर्णपणे शाहरुखने घडलेली गोष्ट आहे. अब्रॅहम हा ईश्वराचा प्रेषित होता. ईश्वराच्या प्रेषिताला सैतान कोणती बाब पटवून देऊ शकत नाही. कदाचित शाहरुखला वाटलं असेल की आपण गोष्ट खोटी जरी सांगत असलो तरी आपण इस्लामची प्रतिमा सुधारण्याचा प्रयत्न करत आहोत. पण इस्लामला गरज नाही की त्याची प्रतिमा कोणी सुधारावी. तो पूर्णपणे सुधारित धर्म आहे. फक्त शाहरुखसारखे शून्यज्ञानी मुस्लिम इस्लामचा स्वतः अभ्यास करण्यापेक्षा इतरांना इस्लाम शिकवण्याचा प्रयत्न करतात ही दुःखाची बाब आहे.

करमणूक करणाऱ्या लोकांकडून कोणती गंभीर गोष्ट बाहेर पडू शकत नाही याचा पुरावा म्हणजे पूर्ण चित्रपट आहे. एकंदरीत पूर्ण चित्रपटामध्ये स्वतःच्या युक्तिवादावर आधारित इस्लामचे दर्शन होते. वास्तविक मुसलमानाचे चित्र कोणाच्याच भूमिकेतून रेखाटलेले नाही. मग तो शाहरुख असेल किंवा त्याची आई, किंवा वहिनी, किंवा भाऊ किंवा चित्रपटातील खलनायक किंवा आणखी कोणी. सर्वांच्या भूमिका 'वी आर नॉट द टेररिस्ट्स्' पेक्षा 'वी आर नॉट द मुस्लिमस्' अशा होत्या. ते एखादी चांगली गोष्ट करत बोलत असल्याचे सुद्धा कोणाला वाटत असेल तरी या चांगल्या कृतींना ईश्वराकडे कोणतीच किंमत नाही. आणि प्रत्येकाला उद्या ईश्वराकडे जायचे असल्यामुळे त्याच्याकडे कोणत्या कृतीला किंमत आहे याची काळजी करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

अब्दुस् समी चाऊस,
चाऊस प्रकाशन,
पुणे.